नि.फौ.ख.क्र. ३८२/२०२४
सरकार/ प्रदीप शेटे
नि.क्र.३७
साक्षीदार क्र.३

शपथेवर सांगतो की,
माझे नावः– सचिन श्रीशैल अथणी
वय– ३८ वर्षे, धंदा– ड्रायव्हर
रा. नांद्रे, ता. मिरज, जि. सांगली.

<u>सरतपास सरकार तर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री.एम.डी.बागल यांचेमार्फत</u> –

१. संदीप शेटे व धनश्री शेटे यांना मी ओळखतो. ते माझे भाऊजी व बहिण आहेत. आरोपी क्र.०१ यांना मी ओळखतो. ते माझ्या भाऊजींचे भाऊ आहेत. घटना कधी व काय घडली हे मला आठवत नाही. माझे भाऊजी व आरोपी क्र.१ यांच्यामध्ये वादावादीची घटना घडली त्यामुळे आरोपी क्र.१ याने त्यांना मारहाण व शिवीगाळ केली होती किंवा कसे हे मला सांगता येणार नाही.

**(साक्षीदार अभियोग पक्षाला सहकार्य करीत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी वकिलांनी साक्षीदारास उलट तपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)**

२. मी आरोपी क्र.१ विरुध्द एप्रिल २०२४ च्या पूर्वी ६ महिने फिर्याद दाखल केली होती किंवा हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे, आरोपी माझ्या वर व माझ्या मेहुण्यावर चिडून होता. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०३/०४/२०२४ रोजी सायंकाळी ५ च्या सुमारास आरोपी क्र.१ हा दारु पिवून माझ्या भाऊजींच्या दुकानाबाहेर आला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ माझ्या भाऊजींना म्हणाला की मेहुण्याने केलेली तक्रार मागे घ्यायला सांगून शिवीगाळ करु लागला व दुकाना शेजारील काठी घेवून माझ्या भाऊजींच्या अंगावर धावून आला व त्यांना काठीने उजव्या हाताच्या मनगटावर व डाव्या हातावर मारहाण करुन निघून गेला. हे म्हणणे खरे नाही की, सर्व प्रकार त्यांनी माझ्या बहिणीला फोन करुन सांगितला व तिला दुकानात बोलवून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ हा आरोपी क्र.२ ते ४ यांना घेवून आला व पुन्हा माझ्या भाऊजींना लाथाबुक्यांनी मारहाण करु लागला व शिवीगाळ करु लागला. हे म्हणणे खरे नाही की, माझी

बहिण धनश्री ही भांडणे सोडवायला आली असता आरोपींनी माझ्या बहिणीला शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी देवून निघून गेले. हे म्हणणे खरे नाही की, माझे भाऊजी व माझी बहिण यांनी मिळून सांगली शहर पोलीस ठाण्यात फिर्याद देण्याकरीता गेले असता पोलीसांनी त्यांना उपचारासाठी सांगली सिव्हील हॉस्पीटल येथे पाठवले व तेथून उपचार घेवून आल्यानंतर त्यांनी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, अभिलेखावरील फिर्याद ही तिच असून त्यातील मजकूर का माझ्या भाऊजींच्या सांगण्याप्रमाणे नोंदवलेला आहे. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखांकीत भाग इ दाखविण्यात आला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. तो पोलीसांनी का नमूद केला याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमच्यामध्ये तडजोड झाली असून आमचे आपसात मिटलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे पुरसिस दाखल आहे व त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ हा माझ्या भाऊजींचा चुलत भाऊ असून त्याला शिक्षा होवू नये म्हणून मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला मराठी लिहिता वाचता येते व कोणत्याही कागदावर सही करण्यापूर्वी मी तो वाचून पाहत असतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर कामातील जबाबावर मी तो वाचूनच सही केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे श्री.आर.आर.शिंपी यांनी नाकारला.**

**वाचून पाहिले.**

----------

**साक्षीदाराची सही**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

**सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.**

ONKAR SANJAY SHASTRI Digitally signed by ONKAR SANJAY SHASTRI Date: 2026.04.09 17:39:15 +0530

**(ओंकार सं. शास्त्री)**

**दिनांक–०९/०४/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,सांगली**

**(न्यायालय क्र.५)**